19-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 18-02-2025 22:26 Page 1

निवडक

महाराष्ट्र मंडळातर्फे आज शिवजयंतीचे पणजी येथे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १८ : महाराष्ट्र मंडळ गोवाच्या वतीने हिंदवी स्वराज्य संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या शिवजयंती महोत्सवानिमित्त पणजीत मिरामार येथे बुधवार दि. १९ आणि गुरुवार दि. २० रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला शिवप्रेमीनी उपस्थिती राहवून विविध उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे सचिव विजय कुडाळकर यांनी केले आहे.

यंदा स्वराज्य संस्थापक, जाणता राजा श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ आणि २० या २ दिवशी पणजी गोवा येथे साजरी होत आहे. बुधवार दि. १९ रोजी पहाटे ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापित केलेल्या नार्वे येथील सप्तकोटेश्वर मंदिरातून मिरामारपर्यंत मशाल दौड काढण्यात येईल. स्व. वासंती विठू गावस चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा नेहा शैलेश आंग्रे– गावस यांच्या हस्ते पूजा करून या मशाल दौडला सुरुवात होईल.

यावेळी खोर्लीचे सरपंच गोरखनाथ केरकर उपस्थित असतील. सकाळी ९ वाजता मिरामार युथ हॉस्टेल येथे शिवप्रेमी ॲड. शैलेश गावस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे अभिषेक, पूजन व आरती होईल. सायंकाळी ४.३० वाजता मिरामार सर्कल ते युथ हॉस्टेल छत्रपती शिवरायांची वाजत गाजत पालखी मिरवणूक व शिवगर्जना होईल. तर सायंकाळी ६.३० वाजता मुले व महिलांसाठी हळदी कुंकू आणि विविध स्पर्धा होतील.

२० रोजी सायंकाळी ४.३० वाजता मंडळामार्फत मुले व महिलांसाठी रांगोळी, वक्तृत्व, निबंध, चित्रकला आणि मैदानी स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्यानंतर ६.३० वाजता आपल्या अलौकिक कर्तृत्ववान गोवा राज्याचे नाव देशभर व जगभर पोहोचविणाऱ्या विशेष प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांचा 'बहिर्जी नाईक पुरस्काराने' सन्मानित करण्यात येईल. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, नेहरू युवा केंद्राचे उपसंचालक कालिदास घाटवळ, स्व. वासंती विठू गावस चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा नेहा आंग्रे – गावस उपस्थित असतील. यानंतर अंजू देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित मराठी संस्कृतीचे दर्शन घडवणारा सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

बोरी येथील नवदुर्गा संस्थानाच्या अध्यक्षपदी शाम प्रभुदेसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. १८ : येथील श्री नवदुर्गा संस्थानाच्या सभागृहात आज झालेल्या देवस्थान समिती निवड प्रक्रियेत २०२५–२८ साला साठी अध्यक्षपदी शाम प्रभुदेसाई यांची निवड बिनविरोध अध्यक्षपदी करण्यात आली. सदर निवडणूक अधिकारी म्हणून बोरी पंचायत सचिव प्रसाद नाईक यांच्या देखरेखीखाली झाली, त्यांना संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत दिलीप प्रभुदेसाई व प्रमोद भट यांनी सहाय्य केले. संपुर्ण समिती बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान अध्यक्ष शाम प्रभुदेसाई चौथ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध निवडून आले, त्यांच्या कार्यकाळात मंदिर परीसर सिद्धनाथ पर्वतावरील मंदिर आवेडे बोरी येथील श्री नारायण देव मंदिर श्री नवदुर्गा संस्थानाची भव्य अग्रशाळा प्रकल्प असा चौफेर मंदिर विकास करण्यात आल्याचे आज उपस्थित असलेले महाजनांनी आमच्या प्रतिनिधींना सांगितले.

सचिवपदी सुनील प्रभुसावकार यांची सुद्धा बिनविरोध निवड करण्यात आली. सुनील सावकार या पुर्वी श्री नवदुर्गा संस्थान अध्यक्ष व बोरी पंचायतीचे सरपंच होते त्यांच्या काळात सुद्धा श्री नवदुर्गा संस्थानाच्या विकास कामांना चालना मिळाली होती. खजिनदारपदी दिगंबर शेणवी बोरकर बिनविरोध निवडून आले महत्त्वाचे अर्टनीपदी कैलास प्रभुदेसाई यांची बिनविरोध निवड करण्यात आली. समितीचे इतर पदाधिकारी उपाध्यक्षपदी सचीन प्रभु सावकार, उपसचीव विश्वनाथ वर्दे बोरकर, उपखजिनदार दिनेश प्रभु देसाई, उपअर्टनीपदी उज्वल प्रभुदेसाई यांची निवड करण्यात आली. सदर बैठक व निवडणूक प्रक्रिया हसतखेळत वातावरणात झाली. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष शाम प्रभुदेसाई यांनी उपस्थित सर्व महाजनांचे आभार मानले व पुढिल मंदिर विकासासाठी सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पणजी आणि बँक टोलिक यांना पहिला राजभाषा पुरस्कार प्रदान

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाने १७ फेब्रुवारी रोजी जयपूर येथे मध्य, पश्चिम आणि उत्तर राज्यांसाठी संयुक्त प्रादेशिक राजभाषा परिषद आणि पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी, राजस्थानचे माननीय मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी वर्ष २०२३–२४ साठीचा पहिला राजभाषा पुरस्कार सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय, पणजी आणि बँक टोलिक, पणजी यांना प्रदान केला.

हा प्रतिष्ठित पुरस्कार बँकेच्या अधिकृत कामात हिंदी व अधिकृत भाषेच्या अंमलबजावणी, संवर्धन आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्यात आला.सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय, पणजी यांच्या वतीने प्रादेशिक प्रमुख आणि अध्यक्षा, सुश्री ऑलिव्हिया परेरा आणि सहाय्यक व्यवस्थापक आणि सदस्य सचिव, डॉ. सुमेध हडके यांनी हा पुरस्कार स्वीकारला.सेंट्रल बँक ऑफ इंडिया आपल्या अधिकृत कामात हिंदी भाषेचा प्रचार करण्यासाठी आणि अधिकृत भाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने वचनबद्ध आहे. हा पुरस्कार बँकेच्या हिंदीच्या कार्यासाठी असलेल्या समर्पणाचा पुरावा आहे आणि भविष्यात संस्थेला त्यांचे प्रयत्न सुरू ठेवण्यासाठी प्रेरित करतो.

हरमल येथे आज एकपात्री सादरीकरण व बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १८ : येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सवात बुधवार दि. १९ रोजी दुपारी ३.३० वाजता हरमल गाव मर्यादित वेशभूषा एकपात्री सादरीकरण होणार असल्याचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी सांगितले. हरमल मर्यादित ८ ते १६ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी वेशभूषा सादरीकरण होईल,त्यात फक्त १५ मुलांना संधी दिली जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क ८८८८५५४९६६ साधावा असे कळविले आहे. तत्पूर्वी संध्या ५.३० वाजता बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे आमदार जीत आरोलकर तसेच सरपंच संतान फर्नांडिस व अन्य उपस्थित राहणार आहेत.ह्या सोहळ्यात युवा कीर्तनकार सना सुधाकर साटेलकर हीचा गौरव होणार आहे. नाट्य प्रवेश स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे वितरीत करण्यात येईल. त्यानंतर संध्याकाळी ६.३० वाजता प्रख्यात कीर्तनकार कैलास खरे, मुंबई यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन संघर्षावर आधारित कीर्तन होईल. यंदाची स्पर्धा अर्जुन खोर्जे, योगेश कोरकणकर, राजन नानोस्कर, मनोज कोरकणकर, दत्ताराम भाऊ पेडणेकर, माजी सरपंच, विद्यमान पंच रजनी इब्रामपुरकर, पंच सुशांत गावडे, उदय बाबुसो वायंगणकर यांनी श्रीमती चंद्रावती (आई), श्रीमती वत्सला वायंगणकर (आत्या) स्मरणार्थ, नितीन कुडव, प्रकाश दाभोलकर, भाऊ बर्डे यांनी पुरस्कृत केली आहे. तरी शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

स्वरगंधातर्फे आज एक पात्री सभिनय वेशभूषा स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १८ : मांद्रे स्वरगंधा संस्थेने यंदाच्या शिवजयंती उत्सवाप्रित्यर्थ प्राथमिक विभागातील मुलांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले आहे. सदर स्पर्धा बुधवार दि. १९ रोजी सकाळी ९.३० वाजता श्री सातेरी देवस्थान मराठवाडा मांद्रे येथे होणार आहे. स्पर्धा पेडणे तालुका मर्यादित असून प्रथम नावनोंदणी करणाऱ्या फक्त १० शाळानाच प्रवेश दिला जाणार आहे. प्रत्येक शाळेतून २ स्पर्धक पाठवायचे आहेत. स्पर्धकांना राजमाता जिजाऊ, ताराराणी, छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास स्वामी, शंभू राजे, बाजी प्रभू इत्यादींच्या भुमिका साकारता येतील. स्पर्धकांना २ ते ३ मिनिटांचा संवाद सवेष साभिनय सादर करावा लागेल. नाव नोंदणीसाठी ८५५१००४३८७ (राजेश हरमलकर) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

आरसीबीचा दिल्लीवर शानदार विजय

महिला प्रिमिअर लिग | स्मृती मंधानाच्या वादळी खेळीने दिल्लीची उडवली दाणादाण

बंगळुरू, दि. १८ :

आरसीबीने महिला प्रीमियर लीग २०२५ मध्ये सलग दुसरा विजय नोंदवला आहे. सोमवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात बंगळुरू कर्णधार स्मृती मंधानाच्या वादळी खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सचा ८ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर सलग पाचवा विजय मिळवत मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली. वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्ली संघाने प्रथम फलंदाजी करत १४१ धावा केल्या, प्रत्युत्तरात आरसीबीने २२ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा पराभव केला.

या सामन्यात आरसीबीची कर्णधार स्मृती मंधानाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. दिल्लीने शफाली वर्माची विकेट लवकर गमावली पण मेग लॅनिंग आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या ५९ धावांच्या भागीदारीने दिल्लीला चांगली सुरुवात करून दिली. रॉड्रिग्जने ३४ धावा केल्या, पण त्यानंतर संघाला मोठ्या भागीदारी रचण्यात संघर्ष करावा लागला. सारा ब्राइसने शेवटच्या षटकांमध्ये २३ धावा करून दिल्ली कॅपिटल्सना १४१ धावांचा सन्मानजनक आकडा गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. रेणुका आणि जॉर्जिया यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. तसेच किम गार्थ आणि एकता बिश्त यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरुवात केली आहे. कर्णधार स्मृती मंधाना आणि डॅनियल यांनी आरसीबीला चांगली सुरुवात करून दिली. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी १०७ धावांची भागीदारी केली. ही डब्ल्यूपीएलमध्ये दिल्लीविरुद्ध कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी आहे. मंधानाने अर्धशतक झळकावले तर डॅनिएल अर्धशतक झळकावू शकली नाही आणि ३३ चेंडूत सात चौकारांसह ४२ धावा काढल्यानंतर बाद झाली. स्मृतीने ४७ चेंडूत ८१ धावांची खेळी साकारली, ज्यामध्ये १० चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता.

आरसीबीने दिल्लीला बराच काळ विकेट मिळू दिली नाही, परंतु अरुंधती रेड्डीने डॅनियलला बाद करून ही भागीदारी मोडली. डॅनियल बाद झाल्यानंतरही, मंधानाने तिची शानदार खेळी सुरू ठेवली, ज्यामुळे आरसीबी चांगल्या स्थितीत आली. १४ षटकांत आरसीबीने १ बाद १३२ धावा केल्या आहेत आणि विजयासाठी ३६ चेंडूत ११ धावांची आवश्यकता आहे. यानंतर पेरी (७) आणि घोष (११) यांनी नाबाद राहत आरसीबी १६.२ षटकात विजय मिळवून दिला.

स्मृती मंधानाने केला कहर – स्मृती मंधाना टी–२० सामन्यांमध्ये धुमाकूळ घालत आहे. तिने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध ८१ धावांची खेळी खेळली. गुजरात जायंट्सविरुद्ध फक्त ९ धावा काढल्यानंतर ती बाद झाली होती, पण टी–२० सामन्यांमध्ये तिचा फॉर्म इतका चांगला आहे की तिने गेल्या ६ टी–२० डावांमध्ये ३२४ धावा केल्या आहेत, ज्यात चार अर्धशतकांचा समावेश आहे.

सरकारी विद्यालय कुडचिरेचा क्रीडा मेळावा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १८ : येथील सरकारी प्राथमिक विद्यालय कुडचिरेचा क्रीडा क्रीडामेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहूण्या म्हणून सरकारी माध्यमिक विद्यालय कुडचिरेच्या मुख्याध्यापिका सर्वेदा गावकर उपस्थित होत्या तर सन्माननीय अतिथी म्हणून वन मावळींगे कुडचिरेच्या सरपंच दिया गावकर तर पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष अभिलाषा गावकर उपस्थित होत्या.क्रीडा ज्योत पेटवून उद्घाटन करण्यात आले.

कुडचिरेतील चार बालवाडीतील विद्यार्थ्यांनी सुद्धा सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या

कुडचिरे : क्रीडा मेळाव्यात विजेत्यांना बक्षीस प्रदान करताना सर्वेदा गावकर. सोबत मान्यवर.

क्रीडा प्रकारात आपले कौशल्य दाखविले. पालकांसाठी धावण्याची शर्यत आयोजित केली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षिका शुभदा कांबळे यांनी केले. तर मंदा शेट व संगीता गाड यांनी बक्षीस वितरणाची जबाबदारी पार पाडली तर प्रीती गावकर व शंकर सावंत यांनी सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक योगेंद्र बांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

गोवा समग्र शिक्षा राज्यस्तरीय प्रतिभा प्रदर्शनचे बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

गुळेली, दि. १८ : गोवा समग्र शिक्षा, पर्वरी गोवातर्फे मिनेझिस ब्रिगांझा संस्था पणजीच्या सभागृहात विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्व समावेशक शिक्षणाअंतर्गत राज्यस्तरीय प्रतिभा प्रदर्शनाचे बक्षीस वितरण कार्यक्रम झाला.यावेळी वर्षा नाईक संचालक, गोवा अपंगत्व आयोग संचालनालय, सन्माननीय अतिथी डॉ. शंभू घाडी राज्य प्रकल्प संचालक, गोवा समग्र शिक्षा व पुष्पल साखरदांडे राज्य प्रकल्प समन्वयक, गोवा समग्र शिक्षा उपस्थित होते. वर्षा नाईक यांनी गोवा समग्र शिक्षातर्फे चाललेल्या कार्याची स्तुती करत आपल्याकडूनही अशा कार्याला समर्थन असल्याचे सांगितले.

डॉ. शंभू घाडी, राज्य प्रकल्प संचालक यांनी सर्व समावेशक शिक्षणाअंतर्गत गोवा समग्र शिक्षातर्फे विशेष गरज असलेल्या मुलांसाठी चालत असलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्पल साखरदांडे राज्य प्रकल्प समन्वयक यांनी केले. या कार्याक्रमाला तालुका स्तरीय प्रतिभा प्रदर्शनातील विजेते विद्यार्थी, पालक, शिक्षक, तालुका गट संसाधन समन्वयक व बी. आर. पी. उपस्थित होते. यावेळी राज्यस्तरीय स्पर्धेतील विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख बक्षीस प्रदान करण्यात आली. तसेच सहभागी विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी लोक चेतना हायस्कूल तिसवाडी व आल्मेडा विद्यालय फोंडाच्या विशेष मुलांनी स्वागतपर नृत्य सादर केले.

पणजी : राज्यस्तरीय स्पर्धेतील विद्यार्थ्यांना बक्षीस प्रदान करताना वर्षा नाईक. सोबत डॉ. शंभू घाडी व पुष्पल साखरदांडे.

'सं. भिऊ नकोस' नाटकाला रसिकांचा उदंड प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १८ : मुरारी उत्तम जिवाजी लिखित,मिथिलेश मनोहर बांदेकर निर्मित व दिग्दर्शित अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या जीवनावर आधारित 'संगीत भिऊ नकोस' नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण नुकतेच श्री राष्ट्रोळी ब्राम्हण देवस्थान पिंपळाजवळ चार रस्ते करासवाडा म्हापसा येथे करण्यात आले.

रंगमंचावर गाय जिवंत होणे, नागसर्पांचा संचार, स्वामी समर्थ लोकांमधून येत प्रवेश करणे, वारूळ फोडून स्वामी समर्थांचे दर्शन इत्यादी ट्रिकसीनयुक्त दृश्ये या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आली. प्रेक्षकांचा चांगल्यापैकी प्रतिसाद या प्रयोगासाठी लाभला.

या नाटकात केशव शेटकर (पुराणिक बुवा), राघव हळर्णकर (बाळ), बाबनी शेटकर (स्वामी), अजित आजगावकर (उद्धव/प्रसार), तुकाराम हळर्णकर (सेवादास), उदय हरमलकर (रामदास), चंद्रकांत हरमलकर (कृष्णदास), विष्णू नाईक (पंगू), भिमराज सातार्डेकर (कुटील/अहमदशहा), रुपेश ताम्हणकर (घोळाप्पा), सूर्यकांत माड (बाळाप्पा), दिगंबर हरमलकर (बसप्पा), मिथिलेश बांदेकर (रजक/पुजारी), पुंडलिक ताम्हणकर (दाजीबा/नाना बर्वे/मालोजीराव), दिव्यता हरमलकर (अंबिका देवी/लक्ष्मी महाराणीसाहेब/येसूबाई), साक्षी ऐवाळे (सुंदराबाई), आर्या ताम्हणकर (दासी), उमेश विनोंडकर (चिंतोपंत) यांनी उत्कृष्टरित्या भूमिका साकारल्या. हार्मोनियमवर महेश गावस, तबल्यावर जयेश हळदणकर, पार्श्वसंगीत किरण कला केंद्र, रंगमंच बर्वे, नृत्य दिग्दर्शन दिव्यता धनराज हरमलकर यांनी केले.

पं. रामदास कामत यांचे संगीत क्षेत्रात मोठे योगदान

मुख्यमंत्री : रवींद्र भवन साखळीच्या परिषद कक्षाला पंडित रामदास कामत यांचे नाव

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १८ : साखळीचे सुपुत्र स्वर्गीय पंडित रामदास कामत यांचे नाट्य क्षेत्रातील व गायन क्षेत्रातील योगदान महान आहे. या सुपुत्राने जागतिक पातळीवर साखळीचे नाव अजरामर केले, त्यांच्या स्मृतीनव्या पिढीसाठी स्मरणात राहाव्यात याच हेतूने रवींद्र भवनाच्या परीकशद कक्षाला पंडित रामदास कामत, असे नामकरण करण्यात आल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळीत केले.

पंडित रामदास कामत यांच्या जयंतीनिमित्त रवींद्र भवनच्या परिषद कक्षाला पं. रामदास कामत यांचे नाव देण्यात आले त्याचे अनावर मुख्यमंत्र्यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी रवींद्र भवनचे उपाध्यक्ष विशांत चिमुलकर संचालक मंडळ तसेच कला सन्मान पुरस्कार विजेते कलाकार व संगीत प्रेमी उपस्थित होते. आज अनेक कलाकार घडत असताना त्यांचा हेतू हा नौकरी पुरता मर्यादित न राहता त्यांनी सातत्याने रियाज करणे गरजेचे आहे. सातत्याने रियाज केल्याने रामदास कामतांसारखे दर्जेदार कलावंत घडू शकतात त्यासाठी सर्वांनी संगीताची आराधना करताना सातत्याने साधना करणे महत्त्वाचे आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

साखळी : पंडित स्व. प्रभाकर कारेकर यांना आदरांजली वाहताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत रवींद्र भवनचे संचालक मंडळ व कलाकार.

पंडित रामदास कामत यांनी मराठी नाट्यसृष्टीत अनेक अजरामर भूमिका, तसेच गायन करताना नाट्य संगीताला एका वैशिष्ट्यपूर्ण उंचीवर नेऊन ठेवले. त्यांचे सतत स्मरण करताना नव्या पिढीच्या गायकाने कलाकाराने त्यांचा आदर्श घेऊन सातत्याने मेहनतीने ही कला जोपासावी असे आवाहन त्यांनी केले. (प्रभाकर कारेकर यांना श्रद्धांजली) मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी ज्येष्ठ गायक स्वर्गीय पंडित प्रभाकर कारेकर यांच्या कार्याचाही गौरव करताना त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले व पुष्पहार अर्पण केला

लॉकी फर्ग्युसन चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर

नवी दिल्ली, दि. १८ :

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन हा स्नायूंच्या दुखापतीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी काइल जेमीसनला संधी देण्यात आली आहे. न्यूझीलंडचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीचा पहिला सामना बुधवार दि. १९ रोजी पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. अशा परिस्थितीत, शेवटच्या क्षणी फर्ग्युसनचे स्पर्धेतून बाहेर पडणे हा संघासाठी मोठा धक्का आहे. उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनला सुमारे १० दिवसांपूर्वी णए लीग खड्ढर२० च्या सामन्यादरम्यान दुखापत झाली होती. त्याच्या स्नायूंमध्ये ताण आला होता.

३३ वर्षीय फर्ग्युसनला आएलटी२० पात्रता फेरीत दुखापत झाली होती. तो डेझर्ट वाइपर्सचा कर्णधार होता. तो डावातील शेवटचे षटक टाकत होता. त्याला अस्वस्थ वाटले आणि तो मैदानाबाहेर गेला. मोहम्मद आमिरने षटकातील शेवटचा चेंडू टाकला.



कॅपिटल्सना शेवटच्या चेंडूवर एक धाव हवी होती आणि सिकंदर रझाने चौकार मारून दुबई कॅपिटल्सला अंतिम फेरीत पोहोचवले. सामन्यानंतर फर्ग्युसन म्हणाला, 'ही फक्त हॅमस्ट्रिंगची थोडीशी समस्या आहे.' मला शेवटचा चेंडू टाकता आला असता तर बरे झाले असते.

फर्ग्युसनचा चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी न्यूझीलंड संघात समावेश करण्यात आला. तो न्यूझीलंडच्या केंद्रीय करारातून बाहेर आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर त्याने न्यूझीलंडकडून एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 167 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .